D:\xyzGR13



महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळांतर्गत शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास उपकंपनीची (Subsidiary) स्थापना करण्याबाबत.......

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक इमाव २००८/प्र.क्र.२८१/विघयो-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २५ ऑगस्ट, २००९.

वाचा :- १) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक इमाव १०९६/प्र.क्र.३९५/विघयो-२, दिनांक २५ सप्टेंबर, १९९८.

**प्रस्तावना :-** कुणबी समाजाच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याची मागणी गेली अनेक वर्षांपासून लोकप्रतिनिधी, विविध संघटना यांचेकडून केली जात आहे. त्याअनुषंगाने मा. मंत्री, वित्त यांनी सन २००४-०५ चा अर्थसंकल्प विधानसभेत सादर करताना दिनांक २८.५.२००४ रोजी केलेल्या भाषणानंतर प्रस्तावित महामंडळाच्या स्थापनेची घोषणा केलेली आहे. परंतु एका प्रवर्गासाठी एकच महामंडळ असावे असे केंद्र शासनाचे धोरण असल्याने कोकण विभागातील कुणबी समाजासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणे उचित होणार नाही. तथापि, कोकण विभागातील मागास असलेल्या कुणबी व इतर मागासवर्गीयांची आर्थिक उन्नती व्हावी यासाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळांतर्गत कोकण विभागातील कुणबी व इतर मागासवर्गीयांसाठी "शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळाची" स्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** कोकण विभागातील मागास असलेल्या कुणबी व इतर मागासवर्गीयांची आर्थिक उन्नती व्हावी यासाठी सध्या कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळांतर्गत कोकण विभागातील कुणबी व इतर मागासवर्गीयांसाठी शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यास शासन मान्यता देत आहे. सदरचे महामंडळ "शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ (महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळाची उपकंपनी)" या नावाने संबोधिले जाईल. सदर उपकंपनीचे कामकाज हे महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळाकडून चालविण्यात येईल.

२. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळाच्या रु.५०.०० कोटी एवढ्या अधिकृत भागभांडवलातून या उपकंपनीसाठी रु.१०.०० कोटी एवढे भागभांडवल राहील.

३. सदरच्या उपकंपनीचे कार्यक्षेत्र कोकणातील मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधूदुर्ग या सहा जिल्ह्यांतर्गत राहिल.

१३६

म.रा.इ.मा.वि.वि.म.
मुख्यालय, मुंबई
आवक क्रमांक: २०८३
दिनांक: ३१/१०-९

४. या उपकंपनीचे मुख्य कार्य मुंबई येथे सध्याच्या महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळाच्या मुख्यालयाअंतर्गत राहील.

५. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळाचे सध्याचे व्यवस्थापकीय संचालक हे पूर्ण उपकंपनीचे सध्याचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून काम पाहतील.

६. सध्याच्या महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळांतर्गत कोकण विभागासाठी असलेले सर्व जिल्हा व्यवस्थापकांची कार्यालये ही यापुढे या उपकंपनी अंतर्गत कार्यरत राहतील.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २००९०८२५१८०९०४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(किशोर गजभिये)
सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विभागीय समाजकल्याण अधिकारी, मुंबई विभाग, नवी मुंबई (तीन प्रती)
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळ(मर्या.) मुंबई.
जिल्हा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळ, मुंबई शहर/ मुंबई उपनगर/ ठाणे/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र १ / २, मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई, ठाणे.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
अप्पर कोषागार अधिकारी, कोकणभवन, नवी मुंबई.
वित्त विभाग, (व्यय १४/अर्थोपाय/ अर्थसंकल्प-३/साउ), मंत्रालय, मुंबई.
सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, पाचवा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई३२.
अवर सचिव, (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई३२.
कक्ष अधिकारी, (नियोजन), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई३२.
निवड नस्ती का-विघयो-२.